**नियमीत फौजदारी खटला क्र.६०/२०१३**

**शासन वि. विक्रम**

–:: **नि.क्र.१ लगत आदेश** ::–

मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. पोलीस ठाणे अधिकारी, पोलीस ठाणे देवणी यांनी भारतीय दंड विधानाचे कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ च्या गुन्ह्याकरिता आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. ते सुरुवातीपासुन नियमित गैरहजर आहे आणि प्रकरण गैरजमानती वॉरंट आणि जामीनदारास कारणे दाखवा नोटीस बजावणीकरिता प्रलंबित आहे. परंतु आरोपी क्र. १ ते ४,६ व ७ यांच्या विरुध्द सदर वॉरंट आणि जामीनदारास सदर नोटीस वारंवार काढून सुध्दा ते बजावलेले नाही. पोलीस अहवाला प्रमाणे आरोपी क्र. १ ते ४, ६ व ७ दिलेल्या पत्यावर आढळून आलेला नाही. त्याचे अधिवक्ता प्रकरण चालविण्यास तयार नाहीत. त्यावरून हे निश्चित झाले की, आरोपी हा सदर वॉरंटची बजावणी न व्हावी म्हणून स्वत:ला लपवून ठेवत आहे आणि सदर प्रकरणाची संपरिक्षा टाळत आहे. त्यामुळे प्रकरण विनाकारण व विनाप्रगती प्रलंबित आहे.

०२. सन्माननीय उच्च न्यायालय यांनी जुनी प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्याबाबत आदेशित केलेले आहे. परंतु आरोपीच्या कृतीमुळे त्याच्या गैरहजेरीमध्ये प्रकरण आवश्यक पूर्तता केल्याशिवाय निकाली काढता येणार नाही. आरोपी क्र. १ ते ४, ६ व ७ हे संपरिक्षा टाळण्याच्या दृष्टीने स्वत:ला लपवून ठेवत असल्याने भविष्यात किंवा लगेच त्याच्याविरुध्द गैरजमानती वॉरंटची बजावणी होण्याची शक्यता किंवा ते हजर होण्याची शक्यता नाही. सबब सदर प्रकरणामध्ये त्यास फरार घोषित करणे आवश्यक झाले. भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ८४ प्रमाणे आरोपीविरुद्ध जाहीरनामा प्रकट करणे योग्य ठरेल. सबब, मी खालील आदेश पारीत केला.

**आदेश**

१) भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ८४ प्रमाणे आरोपी क्र. १ ते ४, ६ व ७ विरुद्ध जाहीरनामा प्रकट करावा.

२) पोलीस ठाणे अधिकारी, पोलीस ठाणे देवणी यांनी आरोपी क्र. १ ते ४, ६ व ७ विरुद्ध जाहीरनामा राष्ट्रीय आणि स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रकट करावा.

३) आरोपीविरुध्द गैरजमानती वॉरंट काढावा आणि त्याच्या जामीनदारास जामीन बंधपत्र रद्द करून त्याची रक्कम वसूल का करू नये याबाबत कारणे दाखवा नोटीस काढावे.

४) पोलीस अधिकारी, पोलीस ठाणे देवणी यांनी सदर वॉरंट, नोटीस आणि जाहीरनामा यांचे विहित कालावधीमध्ये बजावणी करावी.

५) आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.11.27 17:38:47 +0530

**ठिकाण – देवणी** **( शरद अ. सुरजुसे )**

**दिनांक – २७–११–२०२५** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, देवणी.**